नवरात्रीच्या देवीचे सहावे रुप :
कात्यायनी देवी



दैनिक
अचूक वेध, अचूक बातमी
# अक्षराज
संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध
Email : newsaksharaj2021@gmail.com

उद्याचा रंग आहे,
करडा

वर्ष : ०६ | अंक : ६३, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, शुक्रवार, दि.१६ ऑक्टोबर २०२६ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056

# वर्षभर फटाके वाजवण्यास पूर्ण बंदी

## मुंबई हायकोर्टाचे कडक निर्देश !



**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.१५, मुंबई :** राज्यभरात सध्या नवरात्रीचा उत्साह आहे. येत्या २० ऑक्टोबरला दसरा सण असणार आहे. त्यानंतर काही दिवसांनी दिवाळी सणाचा उत्साह राज्यभरात असणार आहे. दिवाळीत रात्री आकाशात फटाक्यांची आतषबाजी बघायला मिळते. अनेकदा सार्वजनिक ठिकाणी किंवा सार्वजनिक रस्त्यावंर फटाके फोडले जातात. यामुळे दुर्घटना घडण्याची देखील भीती असते. तसेच फटाक्यांमुळे होणारे ध्वनी आणि वायू प्रदूषणाचा मुद्दा नियमित चर्चेत येतो. याच विषयी मुंबई हायकोर्टात 'सुओ मोटो' याचिकेवर सुनावणी पार पडली. यावेळी मुंबई हायकोर्टाने हे महत्त्वाचे आदेश दिले आहेत.

खरंतर मुंबई हायकोर्टाने ध्वनी आणि वायू प्रदूषणाच्या समस्येच्या निमित्तानं याआधीच २२ सप्टेंबर रोजी फटाक्यांच्या बाबतीत निर्देश होते. त्यानुसार, हायकोर्टाने सार्वजनिक ठिकाणी आणि सार्वजनिक रस्त्यांवर कोणत्याही प्रकारचे फटाके वाजवण्यावर बंदी घातली होती. मत्र, तरीही गणेशोत्सव काळात काही ठिकाणी त्याचं उल्लंघन झालं.

या गुरुवारी याचिकेवर पुढची सुनावणी होती. त्याचदरम्यान 'दी असोसिएशन ऑफ फायरवर्क्स ट्रेडर्स'ने एक अर्ज केला आणि २२ सप्टेंबर रोजीच्या आदेशाबाबत नेमके स्पष्टीकरण देण्याची विनंती केली. त्यामुळे गुरुवारच्या सुनावणीनंतर न्यायमूर्ती गिरीश कुलकर्णी आणि न्यायमूर्ती डॉ. नीला गोखले यांच्या खंडपीठाने अधिक स्पष्टीकरण देणारा आदेश दिला. शिवाय सविस्तर आदेशाची प्रत नंतर उपलब्ध केली जाईल, असेही खंडपीठाने स्पष्ट केलं. तसंच फटाक्यांच्या उत्पादनावर आणि विक्रीवर बंदी घतली नसल्याचंही खंडपीठाने स्पष्ट केलं.

**हायकोर्टाने नेमके काय निर्देश दिले?**

– सार्वजनिक ठिकाणे आणि सार्वजनिक रस्त्यांवर फटाके वाजवण्यावरील बंदी ही संपूर्ण वर्षभरासाठी आणि सर्व उत्सवांमध्ये लागू असेल.

– याविषयी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने वर्तमानपत्रांमध्ये, इलेक्ट्रॉनिक माध्यमांमध्ये तसेच सोशल मीडियामध्ये व्यापक जनजागृती करावी.

– प्रशासनाने बंदीच्या व्यापक जनजागृतीसाठी हवे तर सेलिब्रिटींची मदत घ्यावी.

– पोलिसांनी वॉर्ड स्तरावर याविषयी सूचना प्रसिद्ध कराव्यात.

**हायकोर्टाने याआधीच्या सुनावणीत काय म्हटलं होतं?**

'उत्सव, सण साजरे करण्यास कोणताही आक्षेप नसल्याचे आम्ही यापूर्वीच स्पष्ट केलेलं आहे. परंतु, कोणताही उत्सव हा नागरिकांच्या आरोग्यावर परिणाम करणारा आणि तडजोड करणारा असू शकत नाही. ध्वनी व वायू प्रदूषण सहन करत नागरिकांना जगणं भाग पाडलं जाऊ शकत नाही.

मुंबई, पुण्यासारख्या शहरांत आधीच वायू प्रदूषणाचा प्रश्न गंभीर होत असताना, विषारी स्वरुपाचा धूर पसरवणाऱ्या फटाक्यांना म्हणूनच परवानगी दिली जाऊ शकत नाही. याविषयी नियम व कायदे असूनही त्याची प्रभावी अंमलबजावणीच होत नसल्याचं आणि सरकारी प्रशासने त्याविषयी पुरेसे गंभीर नसल्याचं स्पष्ट होत आहे. म्हणून केवळ सार्वजनिक ठिकाणांच्या बाबतीत बंदीचा आदेश काढावा लागत आहे', असं खंडपीठाने २२ सप्टेंबर रोजीच्या आदेशात स्पष्ट केलं होतं.

# राज्य सरकारचा तृतीयपंथीयांसाठी महत्त्वाचा निर्णय...



**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.१५, मुंबई :** समाजात तृतीयपंथीयांना नेहमीच उपेक्षा आणि तुच्छतेची वागणूक सहन करावी लागली आहे. सम ाजात वावारताना ,सार्वजनिक सोयीसुविधांचा वापर करताना नेहमीच त्यांना अडचणींचा सामना करावा लागतो. मात्र महाराष्ट्र सरकारच्या अनोख्या निर्णयाने समाजात एक लैंगिक समानतेच्या दृष्टीकोनातून महत्त्वाचं पाऊल उचललं आहे.

**अंदाजपत्रकातील रक्कम !**

एसटी बसस्थानकावर स्त्री-पुरुषांसाठी स्वतंत्र स्वच्छतागृहे असली तरी तृतीयपंथीयांसाठी कधी स्वच्छतागृहांचा विचार करण्यात आला नव्हता. आता ही समस्या कायमची मिटणार आहे. कारण संपूर्ण राज्यात महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या बसस्थानकांवर तृतीयपंथीयांसाठी स्वतंत्र स्वच्छतागृहे उभारण्यात येणार आहेत. मुंबई, पुणे, अमरावती, नागपूर, छत्रपती संभाजीनगर आणि नाशिक या जिल्ह्यातील ३१ विभागांमधील विविध बसस्थानकांवर ही स्वच्छतागृहे बांधण्यात येणार आहेत. याबाबतचा निर्णय शासनाने काल बुधवारी जारी केला. यासाठी अंदाजपत्रकाला प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. या अंदाजपत्रकातील रक्कम ही ९ कोटी ७३ हजार १९५ रुपये इतकी आहे.

**या विभागांचा समावेश...**

मराठवाड्यातील धाराशिव, परभणी, बीड, नांदेड आणि विदर्भातील भंडारा आणि यवतमाळ या विभागांचा या योजनेत समावेश होतो. यामधील प्रत्येक स्वच्छतागृह हे सुमारे सहा चौरस मीटरचे असेल. विभागीय खर्च हा थोड्या प्रमाणात वेगवेगळा आहे. यामध्ये रायगड (४८ लाख), अहिल्यानगर आणि नांदेड (प्रत्येकी ५०.४० लाख), कोल्हापूर विभाग (५५.२० लाख), नागपूर (४८.४०लाख), अमरावती (५०.७५ लाख) यामध्ये पाणीपुरवठा, सांडपाणी व्यवस्था आणि वीजजोडणीसह एका युनिटचा खर्च २.४ लाख रुपये अपेक्षित आहे.

**निर्णयाला चांगला प्रतिसाद...**

सामाजिक न्याय व परिवहन राज्यमंत्र्यांकडून स्वच्छतागृहे उभारण्याच्या सूचना या एसटी महामंडळालादेण्यात आल्या होत्या. या कामांचा संपूर्ण खर्च तृतीयपंथीय कल्याण मंडळासाठी मंजूर निधीतून केला जाणार आहे. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाचे हे तृतीयपंथीय कल्याणमंडळ आहे. या शासन निर्णयात काही बाबी बंधनकारक करण्यात आल्या आहेत. यामध्ये काम सुरू करण्यापूर्वी विस्तृत अंदाजपत्रक आणि कार्यकारी अभियंत्यांची तांत्रिक मान्यता घेणं तसेच नकाशांना वास्तुविशारदांची मंजुरी घेणं बंधनकारक असणार आहे. राज्यातील महत्त्वाच्या वाहतूक व्यवस्थेनं हा निर्णय घेतल्यानं हा महत्त्वपूर्ण बदल घडून येणार आहे.

**सर्व स्वच्छतागृहांचा वापर मोफत...**

■ दरम्यान, प्रवाशांना १ जून २०२६ पासून एसटीतील सर्व स्वच्छतागृहांचा वापर मोफत करण्यात आला आहे. तसेच प्रवाशांसह चालक-वाहकांच्या विश्रांतीगृहांमध्ये पुरवण्यात येणाऱ्या सुविधांचाही दर्जा उंचवण्यात आला आहे. परिवहनमंत्रीप्रताप सरनाईक यांनी या निर्णयाची घोषणा केली होती. महामंडळाच्या वर्धापनदिनानिमित्त १ जूनपासून याची अंमलबजावणी करण्यात आली आहे.

# पावसाअभावी लाल कांद्याची लागवड खोळंबली

## भूगर्भातील पाणी पातळीतही घट, उत्तरार्धातील पावसाची प्रतीक्षा

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.१५, अहिल्यानगर :** पारनेर तालुक्यासह टाकळी ढोकेश्वर परिसरात गेल्या तीन महिन्यापासून पावसाने दांडी मारल्याने पिके पाण्याअभावी करपून गेली आहेत. अजूनही समाधानकारक पाऊस न झाल्याने विहिरीच्या पाण्याच्या पातळीत वाढ न झाल्याने लाल कांद्याची लागवड शेतकऱ्याला करता येत नाही. त्यामुळे लाल कांद्याची लागवड खोळंबली आहे.

टाकळी ढोकेश्वर परिसरात लाल कांद्याची मोठ्या प्रमाणात लागवड केली जाते. कांदा या पिकाकडे नगदी पीक म्हणून पाहिले जाते. परंतु या वर्षी अजूनही विहिरींना पाणी न उतरल्यामुळे लाल कांद्याची लागवड कशी करावी हा प्रश्न शेतकऱ्याला पडला आहे. चालू वर्षी पावसाची टाकळी ढोकेश्वर परिसरात सुरुवातीपासून वक्रदृष्टी होती. सुरुवातीच्या नक्षत्रात समाधानकारक पाऊस न झाल्याने शेतकऱ्यांनी अल्पशा पावसावर मका, बाजरी, भुईम ूग, सोयाबीन आदि पिकांची पेरणी केली. मध्यंतरी या परिसरात पावसाने दांडी मारल्याने पिके पाण्याअभावी करपू



लागल्याने शेतकरी चिंतातूर झाला होता.

त्यानंतर रिमझिम पावसाने हजरी लावल्याने पिकांना दिलासा मिळाला असला तरी बळीराजाला मोठ्या पावसाची प्रतीक्षा आहे. दर वर्षी या दिवसामध्ये लाल कांद्याचे बियाणे जुलै महिन्याच्या पहिल्या आठवड्यात टाकले जात असे. म्हणजे लाल कांद्याची लागवड साधारण ऑगस्ट महिन्यापासून होत असते. तेव्हा हा कांदा ऑक्टोबर महिन्यात तयार होऊन बाजारात येतो. परंतु यावर्षी उशीरा झालेल्या पावसामुळे लाल कांद्याचे बियाणे उशिरा टाकले गेले आहेत.

**भूगर्भातील पाण्याच्या पातळीतही घट !**

ज्या शेतकऱ्यांकडे थोडेफार पाणी आहे. अशा शेतकऱ्यांनी कांद्याचे बियाणे टाकले आहेत. तर काही शेतकऱ्यांनी पुढे विहिरीतील पाणी उतरेल या आशेवर ज्या शेतकऱ्यांच्या विहिरीला पाणी आहे अशा शेतकऱ्यांच्या शेतात कांद्याचे बियाणे टाकले आहे. अशी रोपे लागवडीसाठी आली आहेत. परंतु अजूनही टाकळी ढोकेश्वर परिसरात जोरदार पाऊस नसल्याने भूगर्भातील पाण्याच्या पातळीत वाढ न झाल्याने विहिरींना पाणी उतरेल नाही.

# शेतकऱ्यांना हेक्टरी ५० हजारांची मदत द्या;

## मुख्य निवडणूक आयुक्तांचा राजीनामा घ्या



**अक्षराज : बालासाहेब फुलपगार**

**दि.१५, पालम (परभणी) :** पालम तालुक्यात यावर्षी भीषण दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली असून, शेतातील सर्व पिके करपून गेल्याने शेतकरी मोठ्या आर्थिक संकटात सापडला आहे. त्यामुळे शासनाने शेतकऱ्यांना किमान हेक्टरी ५० हजार रुपयांची आर्थिक मदत तातडीने द्यावी, अशी मागणी पालम तालुका काँग्रेस कमिटीच्या वतीने तहसीलदारांकडे निवेदनाद्वारे करण्यात आली.

दुष्काळामुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून, आर्थिक संकटामुळे शेतकरी आत्महत्येकडे वळण्याची परिस्थिती निर्माण झाली आहे. त्यामुळे शासनाने तातडीने शेतकऱ्यांना आर्थिक मदत जाहीर करून दिलासा द्यावा, अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे.

तसेच, निवडणूक प्रक्रियेत अफरातफर झाल्याचा आरोप करत मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांनी राजीनामा द्यावा, अशी मागणीही निवेदनातून करण्यात आली आहे. निवडणूक प्रक्रियेबाबत निर्माण झालेल्या संशयामुळे लोकशाहीला धोका निर्माण होत असल्याचा आरोप काँग्रेसच्या वतीने करण्यात आला.

याशिवाय मिनी बँका व फायनान्स कंपन्यांकडून ग्रामीण जनतेला होत असलेल्या त्रासावर तातडीने आळा घालावा, अशी मागणीही निवेदनात करण्यात आली आहे. शेतकरी व ग्रामीण नागरिकांच्या प्रश्नांवर प्रशासनाने तातडीने कार्यवाही करावी, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे.

सदरील निवेदनावर काँग्रेसचे तालुका अध्यक्ष माधवराव फाजगे यांच्या सह अकबर खा पठाण, शहर अध्यक्ष साबेर कुरेशी, गोपीनाथराव देशमुख, तालुका उपाध्यक्ष, पंडितराव शिंदे, विनायकराव निखाते, पांडुरंग आमले, अशोकराव शिंदे, बळीरामजी वाघमारे, शिवाजीराव भस्के, पांडितराव गायकवाड, कंटीराम कौशले, माधव चवरे, बंधू चवरे, चंद्रकांत खेडकर, केशव जोंधळे, दगडोपंत शिंदे, माधवराव सूर्यवंशी, ज्ञानोबा पारडे, गुलाबराव शिंदे,यांच्या सह्या आहेत.

यावेळी मोठ्या संख्येने शेतकरी आणि नागरिक उपस्थित होते. शासनाने तातडीने मागण्या मान्य न केल्यास तीव्र आंदोलनाचा इशाराही यावेळी देण्यात आला आहे.

# शेतकऱ्यांची क्रूर चेष्टा : ५ हजारांत दिवाळी कशी करायची?

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.१५, अहिल्यानगर :** दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना दिवाळीपूर्वी प्रत्येकी पाच हजार रुपयांची अग्रीम मदत देण्याच्या राज्य सरकारच्या घोषणेवर राष्ट्रवादी (शरद पवार) पक्षाचे खासदार निलेश लंके यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. एक एकर सोयाबीन काढण्यासाठीच पाच हजार रुपये मजुरी लागत असताना या तुटपुंज्या रकमेत शेतकऱ्यांनी दिवाळी कशी साजरी करायची, असा सवाल करत त्यांनी दिवाळीपूर्वी हेक्टरी किमान १ लाख आणि शेतमजूरांना २५ हजार रुपयांची भरीव मदत देण्याची मागणी केली. सह्याद्री अतिथिगृह येथे बुधवारी (१४ ऑक्टोबर) झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीनंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि दोन्ही उपमुख्यमंत्र्यांनी दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना दिवाळीपूर्वी प्रत्येकी पाच हजार रुपयांची अग्रीम मदत देण्याची घोषणा केली. या घोषणेवर प्रतिक्रिया देताना खासदार निलेश लंके यांनी सरकारच्या मदतीच्या धोरणावर प्रश्न उपस्थित केले. राज्य सरकारने २६ सप्टेंबर रोजी दुष्काळ जाहीर केला. त्यानंतर दुष्काळग्रस्त भागांची पाहणी, पीक नुकसानीचे पंचनामे आणि केंद्रीय पथकाचा दौरा अशा प्रक्रिया पार पडल्या आहेत. जवळपास ८१ टक्के पंचनामे पूर्ण झाल्याचे सांगण्यात येत



आहे. एवढ्या प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतरही शेतकऱ्यांना पूर्ण नुकसानभरपाई देण्याऐवजी अग्रीम मदतीची घोषणा का केली जात आहे. असा सवाल लंके यांनी उपस्थित केला.

दुष्काळ जाहीर झाला त्याच दिवशी मदत दिली असती, तर तिला अग्रीम म्हणता आले असते. आता पंचनामे अंतिम टप्प्यात आले आहेत. केंद्रीय पथकाची पाहणीही झाली आहे. मग एवढे दिवस पंचनामे कशासाठी केले? शेतकऱ्यांना पूर्ण नुकसानभरपाई देण्यासाठी सरकार आणखी कशाची वाट पाहत आहे? असे ते म्हणाले. सरकारकडून या मदतीचा मोठा गाजावाजा केला जाईल आणि शेतकऱ्यांची दिवाळी गोड केल्याचा दावा केला जाईल. मात्र, प्रत्यक्षात शेतकरी आर्थिक संकटात असताना एवढ्या रकमेतून त्यांचे प्रश्न सुटणार नाहीत, अशी टीकाही त्यांनी केली.

शेतकऱ्यांनी पेरणी, बियाणे, खते, मशागत आणि मजुरीवर मोठा खर्च केला आहे. पीक हातचे गेल्याने त्यांच्यासमोर देणी फ ेडण्याचाही प्रश्न निर्माण झाला आहे. दिवाळीपूर्वी हेक्टरी किमान १ लाख रुपये मिळाल्यास शेतकऱ्यांना काही प्रमाणात आर्थिक दिलासा मिळू शकतो. पाच हजार रुपयांच्या मदतीने त्यांच्या अडचणी दूर होणार नाहीत, असे त्यांनी स्पष्ट केले. लवकरच मदत जाहीर करू, सकारात्मक निर्णय घेऊ, असे सरकारकडून सांगितले जात आहे. पण लवकरच म्हणजे नेमके कधी? शेतकरी दररोज संकटाशी झुंज देत आहे. शेतकऱ्यांच्या आत्महत्यांचे गंभीर वास्तव समोर असताना आणखी किती दिवस त्यांनी मदतीची प्रतीक्षा करायची? असा संतप्त सवाल त्यांनी केला. ई-पीक पाहणी झालेली असतानाही शेतकऱ्यांना पुन्हा छायाचित्रे आणि कागदपत्रे जमा करण्यास सांगण्यात आले. त्यासाठी त्यांचा वेळ आणि पैसा खर्च झाला. पंचनामे, मंत्र्यांचे दौरे आणि केंद्रीय पथकाची पाहणी झाल्यानंतरही मदत देण्यासाठी आणखी कोणती प्रक्रिया शिल्लक आहे, हे सरकारने स्पष्ट करावे, अशी मागणी त्यांनी केली. सरकारला शेतकऱ्यांविषयी खरोखर कळवळा असेल, तर दिवाळीपूर्वी भरीव नुकसानभरपाई द्यावी. केवळ पाच हजार रुपयांची अग्रीम मदत देऊन शेतकऱ्यांची दिवाळी गोड झाल्याचा दावा करू नये. पंचनामे आणि पाहण्यांच्या नावाखाली वेळ घालवण्याऐवजी शेतकऱ्यांच्या खात्यात प्रत्यक्ष मदत जमा करावी, अशी मागणी खासदार निलेश लंके यांनी केली.




## रेल्वे प्रवाशांसाठी आनंदाची बातमी

सर्वोच्च न्यायालयाने रेल्वे प्रवाशांच्या सुरक्षेसंदर्भात एक महत्त्वाचा निकाल दिला आहे. सध्या, ऑनलाइन रेल्वे तिकीट बुक करताना विम्याचा पर्याय दिसतो. हा प्रवास विमा घेणे बंधनकारक नाही. तो केवळ ऐच्छिक आहे. प्रवाशाला आवश्यक वाटल्यास, तो त्यावर टिक करून तो निवडू शकतो. या विम्यासाठी प्रति प्रवासी ४५ पैसे खर्च येतो. हे पैसेदेखील तिकीट शुल्कासोबत भरावे लागतात. प्रवास विमा रेल्वे प्रवासादरम्यान होणाऱ्या अपघातांसाठी संरक्षण प्रदान करतो. रेल्वे प्रवासादरम्यान काही दुर्घटना घडल्यास, तुम्हाला १० लाख रुपयांपर्यंतची भरपाई मिळेल. तुम्ही फक्त ४५ पैशांच्या प्रीमियमसह १० लाख रुपयांचे विमा संरक्षण मिळवू शकता. हा पर्याय केवळ ऑनलाइन तिकीट बुक करणाऱ्यांसाठीच उपलब्ध होता. मात्र, आतापर्यंत रेल्वे बुकिंग काउंटरवरून ऑफलाइन तिकीट बुक केल्यास हा विमा उपलब्ध न्हवता.

सर्वोच्च न्यायालयाने नुकताच एक महत्त्वाचा निकाल दिला आहे. २७ ऑक्टोबरपासून काउंटरवरून खरेदी केलेल्या तिकिटांनाही विमा संरक्षण देण्याचे आदेश न्यायालयाने रेल्वेला दिले आहेत. रेल्वे प्रवाशांना संरक्षण देण्याच्या उद्देशाने हा निकाल देण्यात आला आहे. या निकालाची अंमलबजावणी न झाल्यास रेल्वे बोर्ड जबाबदार असेल, असे न्यायालयाने स्पष्ट केले आहे. याची तात्काळ अंमलबजावणी करण्याचे आदेश दिले आहेत.

केंद्र सरकारने ११ मे रोजी सर्वोच्च न्यायालयाला आश्वासन दिले होते की, आरक्षण काउंटरवर बुक केलेल्या तिकिटांना विमा संरक्षण देण्याचा निर्णय घेण्यात आला असून, त्यासाठी योग्य मार्गदर्शक तत्त्वे तयार केली जात आहेत. या संदर्भातील ताज्या सुनावणीत, न्यायालयाने आदेश दिला की, २७ ऑक्टोबरपासून ऑनलाइन तिकिटांप्रमाणेच रेल्वे काउंटरवर बुक केलेल्या तिकिटांनाही विमा लागू करण्यात यावा. या आदेशांची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी रेल्वेची आहे, असेही न्यायालयाने म्हटले.

जून २०२३ मध्ये ओडिशा येथे झालेल्या रेल्वे अपघातासंदर्भात सर्वोच्च न्यायालयात एका याचिकेवर सुनावणी झाली. याचिकाकर्त्याने सर्व मार्गांवर 'कवच' प्रणाली लागू करण्याची विनंती केली होती. या प्रकरणाची सुनावणी करणाऱ्या सर्वोच्च न्यायालयाने, रेल्वे अर्थसंकल्पात प्रवासी सुरक्षेसाठी वाटप केलेल्या निधीवर असमाधान व्यक्त केले. प्रवासी सुरक्षेसाठीच्या अर्थसंकल्पीय तरतुदींचा पूर्ण वापर न झाल्याबद्दल न्यायालयाने संताप व्यक्त केला. या संदर्भात तातडीने कारवाई करण्याचे आदेश दिले.

## आर. सी. पटेल विद्यालयात वाचन प्रेरणा दिवस साजरा

**अक्षराज : नंदकुमार बोरसे**

**दि.१४, शिरपूर :** शिरपूर तालुक्यातील बभळाज येथील आर. सी. पटेल माध्यमिक विद्यालयात भारताचे माजी राष्ट्रपती, 'मिसाईल मॅन' आणि भारतरत्न डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांची जयंती वाचन प्रेरणा दिवस म्हणून उत्साहात साजरी करण्यात आली.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाचे मुख्याध्यापक आर. एल. तवर होते. त्यांच्या हस्ते डॉ. कलाम यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले. यावेळी तवर यांनी डॉ. कलाम यांनी संरक्षण संशोधन व विकास संस्था (डीआरडीओ), भारतीय अंतराळ संशोधन संस्था (इस्रो) तसेच शैक्षणिक क्षेत्रात दिलेल्या योगदानाची माहिती दिली. त्यांच्या प्रेरणादायी जीवनकार्याचा उल्लेख करत विद्यार्थ्यांनी वाचनाची आवड जोपासावी, ज्ञान मिळवावे आणि जीवनात मोठे ध्येय निश्चित करावे, असे आवाहन केले. वाचन प्रेरणा दिनाचे औचित्य साधून विद्यार्थ्यांना महापुरुषांचे देशासाठीचे योगदान, महान क्रांतिकारकांच्या गोष्टी, प्रेरणादायी कथा, कादंबऱ्या, दलित साहित्य, ललित लेख आणि भारतीय संविधान यांसारख्या विविध विषयांवरील वाचनीय पुस्तके उपलब्ध करून देण्यात आली. विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची गोडी निर्माण व्हावी आणि त्यांच्यात विचारशक्ती व लेखनकौशल्य विकसित व्हावे, या उद्देशाने पुस्तक वाचनानंतर उत्कृष्ट पुस्तक अभिप्राय लेखन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले.

# लाखो भाविकांचे श्रद्धास्थान सौंदत्तीची येल्लम्मा देवी..!!

कर्नाटक राज्यात बेळगाव जिल्ह्यातील 'सौंदत्ती' हे एक प्रसिद्ध धार्मिक स्थळ आहे. जिथे 'येल्लम्मा देवी'चे स्थान आहे. ही देवी दक्षिण भारतात विशेषतः महाराष्ट्र, कर्नाटक, आंध्रप्रदेश आणि तामिळनाडूमध्ये मातृदेवी स्वरूपात पुजली जाते. अत्यंत प्राचीन असे हे मंदिर कर्नाटक आणि महाराष्ट्राच्या सीमजवळील एक मुख्य तीर्थक्षेत्र असून विविध राज्यातील भाविक येथे देवीच्या दर्शनासाठी येतात. चला तर या देवस्थानाविषयी अधिक माहिती घेऊया...

**मंदिराचा इतिहास आणि स्वरूप..**

सौंदत्तीच्या येल्लम्मा माऊलीचे मंदिर हे इ.स. १५१४ च्या सुमारास बांधल्याचे सांगितले जाते. भारतीय मंदिर स्थापत्यकलेचा भाग असलेल्या चालुक्य शैलीतील वास्तुकलेचे उत्तम उदाहरण म्हणजे सौंदत्तीचे येल्लम्मा मंदिर. या मंदिरात 'येल्लम्मा देवी' ही मुख्य देवता आहे. जिला 'रेणुका माता' म्हणूनही ओळखले जाते. ही देवता परशुरामाची आई आणि महाशक्तीचा दिव्य अवतार आहे. या ठिकाणी विविध जाती-धर्माचे भक्त समुदाय मोठ्या श्रद्धेने देवीची उपासना करतात.

**मंदिराची आख्यायिका..**

पुरातन काळापासून सौंदत्तीची येल्लम्मा म्हणजेच रेणुका माता तिच्या या मंदिराशी संबंधित एक आख्यायिका सांगितली जाते. त्यानुसार, रेणुका ही रेणु राजाची कन्या होती. जिने क्रोधासाठी प्रसिद्ध असलेल्या जमदग्नी ऋषींसोबत विवाह केला. ऋषी जमदग्नी आणि रेणुका यांना पाच पुत्र होते. त्यांपैकी एक म्हणजे परशुराम. रेणुकेला पतीप्रती असलेल्या





पवित्रतेमुळे आणि भक्तीमुळे वाळूचे भांडे बनवण्याचे अलौकिक वरदान होते. एकेदिवशी आकर्षित झाली आणि यामुळे तिचे पावित्य भंगले. परिणामी रेणुकेला स्वतःची वाळूचे भांडे बनवण्याची शक्ती गमवावी लागली. देवशी रेणुकेला तपोबलाने ऋषी जमदग्नींना घडलेला प्रकार लक्षात आला. संतापाच्या भरात त्यांनी मुलांना मातेचा शिरच्छेद करण्याचा आदेश दिला. परशुरामांनी वडिलांच्या आज्ञेचे पालन केले आणि स्वतःच्याच आईचा शिरच्छेद केला. इतकेच नव्हे तर वडिलांच्या आज्ञेचे पालन करण्यास नकार देणाऱ्या आपल्या भावांचाही त्यांनी शिरच्छेद केला. परशुरामांना आपल्या हातून घडलेल्या कृत्याचा पश्चाताप होताच त्यांनी पित्याकडे आई आणि भावांचे प्राण परत मागितले. त्याक्षणी पितृआज्ञेचे पालन करणाऱ्या परशुरामांना ऋषी जमदग्नींनी जीवनदानाचा वर दिला. ज्याचा वापर करून परशुरामांनी आपल्या आईला आणि भावांना पुन्हा जिवंत केले. यावेळी परशुरामांनी काळा वर्ण असलेल्या एका मृत स्त्रीचे शीर माता रेणुकेच्या धडाला जोडले. ज्यामुळे रेणुका देवी 'येल्लम्मा' म्हणून ओळखली जाऊ लागली. अन्य काही आख्यायिकेनुसार, शिरच्छेदानंतर रेणुका मातेचे शीर ज्या ज्या ठिकाणी पडले त्या त्या ठिकाणी रेणुका देवीचे स्थान तयार झाले. त्यापैकी एक म्हणजे सौंदत्ती. दक्षिण भारतात या देवतेला 'संरक्षक देवी' म्हणून पुजले जाते.

**भक्तांची श्रद्धा !**

सौंदत्तीची येल्लम्मा देवी अनेकांचे श्रद्धास्थान आहे. या मंदिरात पूजा केल्याने शारीरिक तसेच मानसिक त्रासातून मुक्ती मिळते. उत्तम आरोग्य, सुख-समृद्धी आणि जीवनात यश मिळते अशी भाविकांची श्रद्धा आहे. तसेच येल्लम्मा माऊलीकडे मनोभावे प्रार्थना केल्यास नकारात्मक शक्तींपासून रक्षण होते, असेही म्हटले जाते. या मंदिराशी गोंधळी, जोगतीण आणि देवदासी परंपरा पूर्वीपासून जोडलेली आहे. मात्र, गेल्या काही काळात सशक्त सामाजिक बदलांमुळे या परंपरा लोप पावताना दिसत आहेत. उदे ग आई उदे...!!

**- हभप.शिवाजी विठ्ठल चौगुले.**
**कागल-कोल्हापूर**

# नवरात्री उत्सव प्रथे-परंपरेनुसार साजरा व्हावा !

महाराष्ट्रात नवरात्री उत्सव शेकडो वर्षांपासून कुलाचार म्हणून साजरा केला जात आहे. ज्यामध्ये घटस्थापना ही प्रधान असते. नऊ दिवसांत नऊ प्रकारच्या पानांची आणि फुलांची माळ घटावर सोडली जाते. घरासमोर अखंड नंदादीप तेवत ठेवला जातो, काही ठिकाणी त्रिकाळपूजन केले जाते, सुवासिनी नवरात्रीच्या दिवसांत सप्तशती ग्रंथाच्या पाठांचे वाचन करतात, कुमारिकांचे पूजन करून त्यांना भोजन दिले जाते. नऊ दिवस एकभोजनी किंवा निराहार उपवास केला जातो. रात्री देवीचा जागर केला जातो.

ललिता पंचमी, महालक्ष्मी पूजन (घागरी फुंकणे), अष्टमीचे होमहवन, सरस्वती आवाहन-पूजन अशा प्रकारचे धार्मिक विधी नवरात्रीच्या निमित्ताने केले जातात. काही ठिकाणी भोंडल्याचे आयोजन केले जाते. पिढ्यानपिढ्या चालत आलेल्या या प्रथा आता काही भागांपुरत्या मर्यादित राहिल्या आहेत. शहरासारख्या ठिकाणी आता नवरात्रीचाही इव्हेन्ट होऊ लागला आहे. मातीच्या पार्थिव मूर्तीची स्थापना ही केवळ गणेशचतुर्थीला करण्याचे शास्त्रवचन आहे, हल्ली मात्र नवरात्रीच्या निमित्तानेही ठिकठिकाणी देवीच्या मूर्ती आणून त्यांची मंडपांत प्रतिष्ठापना केली जाऊ लागली आहे ज्याला शास्त्राधार नाही. मुंबई सारख्या ठिकाणी गणपतीप्रमाणे देवीच्याही उंच मुर्त्या आणल्या जाऊ लागल्या आहेत.

त्यामुळे मुंबईत उंच गणेशमूर्त्या पाहण्यासाठी भाविकांची आणि पर्यटकांची जशी गर्दी होते तशी पुढील काही वर्षांत नवरात्रीतही होऊ लागल्यास आश्चर्य वाटायला नको. बॅलन्सिंग बाप्पाचा ट्रेंड मुंबईत लोकप्रिय झाल्यानंतर यंदा नवरात्रीतही त्याची झलक दिसून येत आहे. अनेक नवरात्री उत्सव मंडळांनी यंदा आपल्या मंडळांत देवीच्या बॅलन्सिंग मुर्त्या स्थापन केल्याचे पाहायला मिळते आहे. अनंत चतुर्दशीला जशा उंच गणेशमूर्त्या समुद्रकिनारी छिन्न विछिन्न अवस्थेत पाहाव्या




लागल्या तशा आता देवीच्या मूर्तीही दुर्दैवाने पाहायला मिळतील. बॅलन्सिंग बाप्पाच्या मूर्तींची समुद्रकिनारी कशी अवहेलना होते हे यंदा रिल्सच्या माध्यमांतून सर्वांनीच पाहिले, दसऱ्याच्या दुसऱ्या दिवशी देवीच्या मूर्तीही त्याच स्तिथीत पाहायला मिळतील. देवतांचे उत्सव हे मनोरंजनाचे माध्यम नाहीत आणि देवतांच्या मूर्ती ह्या शोभेच्या वस्तू नाहीत याची समज उत्सव साजरा करणाऱ्या मंडळांना केव्हा येणार आहे ? विसर्जनाच्या दुसऱ्या दिवशी समुद्रकिनाऱ्यावरील दृश्य पाहिल्यावर कोणत्याही भाविकांच्या डोळ्यात पाणी आल्याशिवाय राहत नाही.

हिंदू धर्मातील सण उत्सव हे देवतांच्या उपासनेचे पर्व असते. त्या दिवसांत त्या देवतेची मनोभावे आराधना केल्यास इच्छित फळ लाभते मात्र विसर्जनाच्या वेळी देवतेच्या मूर्तींची विटंबना झाल्यास त्यास उत्तरदायी असणाऱ्यास त्याचे पातकही लागते त्यामुळे नवरात्रीत सुरु झालेल्या या घातक ट्रेन्डला वाढण्यापासून थांबवूया आणि पूर्वापार चालत आलेल्या प्रथे परंपरेनुसार नवरात्री उत्सव साजरा करूया !

**- जगन घाणेकर, घाटकोपर, मुंबई**
**संपर्क क्रमांक : ९६६४५५९७८०**

## कात्यायनी मा

या देवी सर्व भुतेषु
कात्यायनी संस्थिता
कात्यायन ऋषिगृही
जन्म घेशी जनहिता

ब्रह्मा विष्णू महेश्वरां
तेज घेतले अंकिता
पुष्प वृष्टी स्वर्गातूनि
महिषासुरा जिंकिता

चतुर्भुजा शस्त्र धारी
महा शक्ती पद्महस्ता
काळजी त्रिलोकांची
विश्वचिंता विश्वातिता

पावसी सत्यसाधका
मा आज्ञा चक्रस्थिता
स्वर्ण वर्णाम् त्रिनेत्री
गं रत्न कुंडल मंडिता

धर्म अर्थ काम मोक्ष
साधने हो परिपूर्णता
रोगभय न् क्रोधहाव
दुर्गुणां करशी चूर्णता

सिंहारूढ ते रौद्ररूप
अरिकरी भयचकिता
थरारली असूर योनी
मुकटोज्ज्वलांदेवता

**- हेमंत मुसरीफ पुणे.**
**९७३०३०६९९६.**

# अस्वस्थता आणि तणावमुक्तीसाठी आनंदी जगणे गरजेचे...

समाजातील बहुसंख्य लोकांमध्ये मानसिक तणाव, असुरक्षिता नकारात्मकता वाढू लागते तेव्हा समाजमन अस्वस्थ होण्याच्या दिशेने वाटचाल सुरू होते सध्या सर्वत्र असेचं चित्र पाहायला मिळते आहे. प्रत्येकाच्या जीवनातील संवेदनशीलता कमी होत चालली आहे. अविश्वास आणि मनातील असुरक्षिततेचे,भीतीचे वातावरण वाढत आहे यापेक्षा अधिक म्हणजे माणसांमध्ये एकाकीपणा वाढत चालला आहे. यामुळेच अगदी शिल्लक आणि साध्या वाटणाऱ्या कारणावरून आजकालची पिढी जीवन संपवताना दिसत आहे. सद्या कुटुंबासमवेत सकारात्मक, खुलेपणाने संवाद, बदललेल्या मानसिक स्थितीबाबतची चर्चा आजकाल कधीही होताना दिसत नाही. त्यामुळे अगदी साध्या अडचणींचा सामना करण्याचे धैर्यहि गमावले जात असल्याचे दिसून येते आहे. पोटदुखी, लग्न न होणे, जगण्याच्या धडपडीसाठी काहीतरी काम करणे यामध्ये आव्हाने अशी काहीच नाहीत. परंतु हे देखील आजच्या पिढीला असाह्य होत आहे. सध्या थोडे जरी बोलले तरी मुलगा तणावाखाली जातो आणि भलतेच पाऊल उचलण्याची शक्यता असते मुलांना रागवायचे, चिडायचे, बोलायचे की नाही असा गहण प्रश्न पालकांच्या पुढे उभा ठाकला आहे. कारण जशी मुलांची मने अस्वस्थ आहेत तशीच पालकांची देखील मने अस्वस्थ आहेत. आजकाल अस्वस्थ मन फक्त ठराविक वयाचे आहे असे म्हणता येणार नाही कारण १० वर्षापासून ते अगदी नव्वदी गाठलेल्या व्यक्तींमध्येही काही ना काही कारणामुळे अस्वस्थता जाणवते हे टाळण्यासाठी सर्वांनी आनंदी जगायला शिकले पाहिजे यासाठी पालक आणि मुले तसेच घरातील प्रत्येकांमध्ये खुला संवाद होण्याची गरज आहे. आज एकलकोंडेपणा वाढत चालला असून तो दूर करण्यासाठी प्रत्येकाने स्वतःपासून सुरुवात करायला पाहिजे तरचं जिवन तणावमुक्त व आनंदी बनेल.

**- राजू जाधव, मांगूर जि. बेळगांव**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

## थोडक्यात बातम्या

# अत्याचार प्रतिबंधक कायद्याबाबत शहापुरात जनजागृतीचा जागर



**अक्षराज : सुनिल फर्डे**

**दि.१५, शहापूर (ठाणे) :** अनुसूचित जाती व अनुसूचित जमातींवरील अत्याचारांना प्रतिबंध घालण्यासाठी, पीडितांना कायदेशीर संरक्षण मिळवून देण्यासाठी आणि नागरिकांमध्ये कायद्याविषयी जागरूकता निर्माण करण्यासाठी शहापूर येथे विशेष नागरिक कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. नागरी हक्क संरक्षण पथक, ठाणे ग्रामीण आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने हा जनजागृती कार्यक्रम पार पडला. या कार्यशाळेत अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती अत्याचार प्रतिबंधक अधिनियम १९८९ तसेच सुधारणा अधिनियम २०१५ मधील तरतुदींबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.

या कार्यशाळेला कोकण परिक्षेत्र नागरी हक्क संरक्षण विभागाचे पोलीस अध्यक्ष जयंत बजबळे आणि शहापूर विभागाचे उपविभागीय पोलीस अधिकारी विशाल नागरगोजे यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रमुख वक्ते व मार्गदर्शक म्हणून कल्याण सत्र न्यायालयाचे सहाय्यक सरकारी अभियोक्ता शंकर रामटेके यांनी नागरिकांना कायद्याच्या विविध तरतुदी, पीडितांचे हक्क आणि कायदेशीर प्रक्रियेबाबत मार्गदर्शन केले.

अनुसूचित जाती-जमातींवरील अत्याचाराच्या घटनांना आळा घालण्यासाठी कायद्याची प्रभावी अंमलबजावणी, पीडितांना न्याय मिळवून देण्याची प्रक्रिया आणि नागरिकांनी अन्यायाविरोधात कायदेशीर मार्गाने कसे पुढे यावे, याबाबत या कार्यशाळेत जनजागृती करण्यात आली. शहापूर तालुक्यातील सर्व पोलीस पाटील तसेच आदिवासी बांधव या कार्यशाळेत सहभागी झाले होते. ग्रामीण भागात कायद्याविषयी जागरूकता निर्माण करण्यासाठी आणि नागरिकांना त्यांच्या हक्कांची माहिती मिळवून देण्यासाठी अशा कार्यशाळा महत्त्वपूर्ण ठरतात.

या कार्यक्रमाचे आयोजन नागरी हक्क संरक्षण पथक, ठाणे ग्रामीण येथील सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रज्ञा बापूसाहेब देशमुख यांनी केले. शिवाजीराव जोंधळे इन्स्टिट्यूट ऑफ लॉ अँड रिसर्च, आसनगाव येथे आयोजित या कार्यशाळेतून सामाजिक न्याय, समानता आणि कायदेशीर हक्कांविषयी जनजागृती करण्याचा संदेश देण्यात आला.

अन्यायाविरोधात आवाज उठवण्यासाठी कायद्याची माहिती आणि नागरिकांमध्ये जागरूकता आवश्यक आहे. कायद्याचे ज्ञान, सामाजिक संवेदनशीलता आणि प्रशासनाचा समन्वय यांमधूनच अत्याचारमुक्त समाजाच्या निर्मितीला बळ मिळू शकते.

# शिक्षणाचा आढावा, गुणवंतांचा गौरव; 'चला शाळेत जाऊ या' अभियानांतर्गत दादाजी भुसे ठाण्यात



**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.१५, ठाणे :** राज्याचे शिक्षण मंत्री दादाजी भुसे हे 'चला शाळेत जाऊ या' अभियानांतर्गत शाळा भेटी आणि शिक्षण विभागाच्या कामकाजाचा आढावा घेण्यासाठी ठाणे जिल्ह्यात दाखल झाले. यानिमित्त जिल्हा नियोजन समिती सभागृहात आयोजित बैठकीत त्यांच्या हस्ते गुणवंत विद्यार्थी, आयडॉल शिक्षक आणि शाळा व्यवस्थापन समितीच्या प्रतिनिधींचा सत्कार करण्यात आला.

या बैठकीला आमदार किसन कथोरे, कुमार आयलानी, ज्ञानेश्वर म्हात्रे, महापौर, ठाण्याचे उपमहापौर कृष्णा पाटील, जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ, मुख्य कार्यकारी अधिकारी रणजीत यादव, शिक्षणाधिकारी बाळासाहेब राक्षे, देविदास महाजन, महानगरपालिका आयुक्त राधाबिनोद शर्मा, अभिनव गोयल, अनमोल सागर, अतिरिक्त आयुक्त प्रशांत रोडे, नगराध्यक्ष, उपनगराध्यक्ष, अंबरनाथ नगरपालिकेचे मुख्याधिकारी उमाकांत गायकवाड, बदलापूर नगरपालिकेचे मुख्याधिकारी मारुती गायकवाड यांच्यासह शिक्षण विभागातील प्रमुख अधिकारी, शिक्षक आणि विद्यार्थी उपस्थित होते.

'चला शाळेत जाऊ या' अभियानाच्या माध्यमातून शाळांना भेटी देऊन शिक्षण व्यवस्थेचा आढावा घेण्यावर भर देण्यात येत आहे. या बैठकीत गुणवंत विद्यार्थ्यांसह शिक्षक आणि शाळा व्यवस्थापन समितीच्या प्रतिनिधींचा गौरव करून त्यांच्या योगदानाची दखल घेण्यात आली.

# शेतकऱ्यांच्या विविध मागण्यांसाठी काँग्रेसचे एकदिवसीय धरणे आंदोलन




**अक्षराज : रहीम कोक्कर**

**दि.१५, जिंतूर :** राज्यात निर्माण झालेली दुष्काळसदृश परिस्थिती आणि शेतकऱ्यांना अपेक्षित आर्थिक मदत मिळत नसल्याच्या मुद्द्यावरून आज, गुरुवार, दि. १५ ऑक्टोबर रोजी जिंतूर तालुका काँग्रेस कमिटीच्या वतीने जिंतूर तहसील कार्यालयासमोर एकदिवसीय धरणे आंदोलन करण्यात आले. यावेळी शेतकऱ्यांना आर्थिक मदत देण्यासह विविध मागण्या शासनासमोर मांडण्यात आल्या. राज्यात अनेक भागांत दुष्काळाची गंभीर परिस्थिती निर्माण झाली असून, शेतकऱ्यांना आर्थिक संकटाचा सामना करावा लागत असल्याचे काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांनी यावेळी सांगितले.

संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना शासनाकडून पुरेसा दिलासा मिळत नसल्याचा आरोप करत, राज्य सरकारने शेतकऱ्यांना प्रति एकर किमान एक लाख रुपये आर्थिक मदत जाहीर करावी, अशी प्रमुख मागणी आंदोलनाद्वारे करण्यात आली. या धरणे आंदोलनाला जिंतूर तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष केशवराव बुधवंत, जिंतूर शहर काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष शेख फेरोज भाई, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे उपाध्यक्ष नागसेन भेरजे, काँग्रेसचे जिंतूर तालुक्यातील ज्येष्ठ नेते प्रदीप सदाशिवराव देशमुख यांच्यासह काँग्रेस पक्षाचे विविध पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

**मतचोरीच्या आरोपांवरूनही काँग्रेसची भूमिका :** देशपातळीवर राहुल गांधी यांच्या नेतृत्वाखाली निवडणूक प्रक्रियेतील कथित मतचोरीच्या मुद्द्यावरून निवडणूक आयोगाच्या भूमिकेबाबत प्रश्न उपस्थित केले जात असल्याचा मुद्दाही यावेळी मांडण्यात आला. या प्रकरणाच्या पार्श्वभूमीवर निवडणूक आयोगाचे प्रमुख ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याची मागणी होत असल्याचे काँग्रेसच्या भूमिकेतून सांगण्यात आले.

**शेतकऱ्यांना दिलासा देण्याची मागणी :** शेतकऱ्यांची आर्थिक परिस्थिती लक्षात घेऊन राज्य सरकारने तातडीने मदतीचा निर्णय घ्यावा आणि संकटग्रस्त शेतकऱ्यांना दिलासा द्यावा, अशी मागणी काँग्रेस पदाधिकाऱ्यांनी केली. शेतकऱ्यांच्या प्रश्नांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी हे धरणे आंदोलन करण्यात आले.

# खासदार लंकेंच्या शिष्टाई नंतर वडगाव सावताळ बसचा मुहूर्त ठरला

## राजदेवांच्या बैठ्या आंदोलनाला यश; १९ ऑक्टोबरपासून खामकर झापमार्गे एसटी धावणार

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.१५, पारनेर (अहिल्यानगर) :** खामकर झापमार्गे वडगाव सावताळ येथे एसटी बस सुरू करण्याची सर्व प्रक्रिया पूर्ण होऊनही प्रत्यक्ष बस सेवा सुरू होत नसल्याने राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते रवींद्र राजदेव यांनी पारनेर एसटी आगाराच्या प्रशासकीय कार्यालयात सुरू केलेल्या बैठ्या आंदोलनाला अखेर यश आले आहे.

खासदार निलेश लंके यांनी या प्रश्नात मध्यस्थी करत शिष्टाई केल्यानंतर पारनेर आगार व्यवस्थापनाने १९ ऑक्टोबर २०२६ पासून पारनेर-वडगाव सावताळ (खामकर झापमार्गे) बस नियमितपणे सुरू करण्याचे लेखी आश्वासन दिले आहे. त्यामुळे अनेक दिवसांपासून प्रलंबित असलेल्या या मागणीला अखेर मुहूर्त मिळाला आहे.



खामकर झापमार्गे वडगाव सावताळ येथे एसटी बस सुरू करण्यासाठी शालेय विद्यार्थ्यांची यादीही आगाराला प्राप्त झाली होती. तरीही बस गावात पोहोचत नसल्याने ग्रामस्थ आणि विद्यार्थ्यांमध्ये नाराजी होती. आश्वासनानंतरही बस सेवा सुरू न झाल्याने या प्रकरणात राजकारण होत असल्याचा आरोप करत राजदेव यांनी निलेश लंके प्रतिष्ठानचे तालुका उपाध्यक्ष युवराज खिलारी, मोहन रोकडे व इतर सहकाऱ्यांसह आगाराच्या प्रशासकीय कार्यालयात बैठे आंदोलन सुरू केले.

विद्यार्थ्यांना शाळा - महाविद्यालयात जाण्यासाठी होणारी गैरसोय आणि ग्रामीण प्रवाशांची अडचण लक्षात घेऊन खासदार निलेश लंके यांनी आगार व्यवस्थापनाशी चर्चा केली. त्यांच्या शिष्टाईनंतर सकारात्मक निर्णय झाला.

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या पारनेर आगार व्यवस्थापक कार्यालयाने दि. १४ ऑक्टोबर रोजी जारी केलेल्या पत्रात, रवींद्र राजदेव यांनी ११ फेब्रुवारी २०२६ रोजी केलेल्या मागणीच्या अनुषंगाने विद्यार्थ्यांची यादी प्राप्त झाल्याचे नमूद करत, १९ ऑक्टोबरपासून नियमित बस सेवा सुरू करण्याचे* स्पष्ट केले आहे. आगार व्यवस्थापक अ. म. कोतकरयांनी हे लेखी आश्वासन दिले आहे.

ग्रामीण भागातील विद्यार्थी आणि नागरिकांसाठी एसटी हा मोठा आधार असून, हा निर्णय ग्रामस्थांसाठी दिलासादायक मानला जात आहे. आता लेखी आश्वासनाप्रमाणे बस नियमित सुरू होते का, याकडे वडगाव सावताळ आणि खामकर झाप परिसरातील ग्रामस्थांचे लक्ष लागले आहे.

# जीवघेण्या वाकी डोहाला सुरक्षा कुंपण

## आमदार डॉ.देशमुख यांच्या पाठपुराव्याला यश; ४८ लाखांच्या कामाला प्रत्यक्ष सुरुवात

**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.१५, नागपूर :** सावनेर तालुक्यातील प्रसिद्ध हजरत ताजुद्दीन बाबा वाकी दर्गा परिसराजवळून वाहणाऱ्या कन्हान नदीच्या खोल डोहात बुडून अनेक निष्पाप भाविक व पर्यटकांना प्राण गमवावे लागले आहे. जीव घेणारी दुर्घटनांची मालिका रोखण्यासाठी आमदार डॉ. आशिष देशमुख यांच्या प्रयत्नातून तब्बल ४८ लाख रुपयांचा निधी मंजूर झाला असून दीड किमी लांबीच्या सुरक्षा कुंपणाच्या कामाला युद्धपातळीवर सुरुवात झाली आहे.

वाकी डोहातील वाढत्या दुर्घटना टाळण्यासाठी उपाययोजना कराव्यात व हा डोह बुजवावा या मागणीसाठी हितज्योती आधार फाऊंडेशनचे संस्थापक हितेश बनसोड आणि सावनेर तालुका मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष किशोर ढुंढेले यांच्या नेतृत्वाखाली शिष्टमंडळाने २ मे रोजी आमदार डॉ. आशिष देशमुख यांची भेट घेऊन निवेदन दिले होते.

यावेळी आमदार डॉ.आशिष देशमुख यांनी पाटबंधारे व महसूल विभागाला प्रत्यक्ष पाहणीचे निर्देश दिले होते. ५ मे ला तहसीलदार अक्षय पोयाम आणि पाटबंधारे विभागाचे कार्यकारी अभियंता किशोर दमहे यांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. एका आठवड्यात ४८ लाख रुपयांच्या सुरक्षा उपाययोजनांचा तांत्रिक आराखडा तयार करून जिल्हा प्रशासनाकडे पाठवण्यात आला.

आमदार डॉ. आशिष देशमुख यांनी जिल्हाधिकारी कार्यालयाकडे पाठपुरावा केला. परिणामी २९ मे रोजी झालेल्या जिल्हा वार्षिक योजने च्या सभेत सदर कामाला प्रशासकीय मंजुरी मिळाली पहिल्या टप्प्यात २० लाख रुपयांचा निधी वितरित झाला असून बांधकाम कामाला सुरुवात करण्यात आली.

सदर प्रकल्पांतर्गत नदीकाठावर जवळपास दीड किलोमीटर लांबीचे मजबूत लोखंडी व काटेरी कुंपण उभारले जात आहे. याशिवाय बॅरिकेडिंग, धोकादायक क्षेत्र दर्शवणारे माहिती फलक, सीसीटीव्ही सुरक्षा कॅमेरे आणि पर्यटकांना डोहाकडे जाण्यापासून रोखण्यासाठी सुरक्षा रक्षकांची नियुक्ती यांसारख्या उपाययोजना केल्या जात आहेत.

१५ ऑक्टोबर रोजी हितज्योती आधार फाऊंडेशनचे संस्थापक हितेश बनसोड, सावनेर तालुका पत्रकार संघाचे पदाधिकारी व सहकाऱ्यांनी वाकी कन्हान नदीकाठावर सुरू असलेल्या कामाची पाहणी केली याप्रसंगी सार्वजनिक बांधकाम विभागाचे अभियंता नाझीर रिजवी व विजय धुर्वे उपस्थित होते सुरू असलेले बांधकाम नियोजित वेळेत पूर्ण होईल असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.



सामान्य जनतेच्या जीवाशी निगडित असलेल्या गंभीर प्रश्नावर केवळ चार आठवड्यांत ठोस तोडगा काढून निधी उपलब्ध करून दिल्याबद्दल आमदार डॉ. आशिष देशमुख यांचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे. तसेच या समस्येला वृत्तपत्रांतून सातत्याने वाचा फोडणाऱ्या सर्व पत्रकार बांधवांचे हितज्योती आधार फाऊंडेशनचे हितेश बनसोड, सावनेर तालुका मराठी पत्रकार संघ, तसेच समाजसेवी मुकेश झरबडे, निखिल पोटभरे, विकेश सहारे, नरेंद्र समदुरकर, आर्यन कातकडे व समस्त हितज्योती परिवाराच्या वतीने आभार व्यक्त करण्यात आले आहेत.

भविष्यात हा जीवघेणा डोह पूर्णपणे सुरक्षित करण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले जातील असा विश्वासही यावेळी व्यक्त करण्यात आला.

# किसनवाडीत शेतातील विहिरीत बिबट्याचे पिल्लू पडल्याने खळबळ

## वनविभागाने केले जेरबंद; कायमस्वरूपी बंदोबस्ताची शेतकऱ्यांची मागणी

**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.१५, विंचूर (नाशिक) :** विंचूर परिसरातील किसनवाडी (कृष्णवाडी) येथे गुरुवारी पहाटे एका शेतकऱ्याच्या विहिरीत बिबट्याचे पिल्लू पडल्याची धक्कादायक घटना समोर आली. सध्या शेतीच्या कामांची लगबग सुरू असतानाच हा प्रकार घडल्याने परिसरातील शेतकरी आणि ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, किसनवाडी येथील शेतकरी मधुकर सालकाडे हे गुरुवारी पहाटे नेहमीप्रमाणे खोकडतळ शिवारातील आपल्या शेतात गेले होते. त्यावेळी विहिरीतून हालचालींचा आवाज आल्याने त्यांनी



डोकावून पाहिले असता, आत बिबट्याचे पिल्लू पडलेले असल्याचे निदर्शनास आले. त्यांनी तात्काळ या घटनेची माहिती ग्रामस्थांना व वनविभागाला दिली.

रेस्क्यू ऑपरेशन यशस्वी; बिबट्या अखेर पिंजऱ्यात बंदिस्त माहिती मिळताच वनविभागाचे पथक व आपत्कालीन रेस्क्यू टीम तातडीने घटनास्थळी दाखल झाली. वनपरिक्षेत्राधिकारी राहुल घुगे, वन परिमंडळ अधिकारी जयप्रकाश शिरसाठ, वनरक्षक विजय दोंदे यांच्या मार्गदर्शनाखाली निफाड रेस्क्यू टीम, अंकुश गुंड तसेच वाईल्ड लाईफ रेस्क्यू टीमचे आसिफ पटेल यांनी स्थानिक ग्रामस्थांच्या मदतीने अत्यंत शिताफीने मोहीम राबवून बिबट्याला सुखरूप बाहेर काढून पिंजऱ्यात बंदिस्त केले. वनविभागाच्या या तत्पर कारवाईमुळे ग्रामस्थांनी सुटकेचा निःश्वास सोडला.

परिसरात बिबट्याची दहशत: 'भीतीच्या सावटाखाली किती दिवस काम करायचे?' गेल्या अनेक दिवसांपासून विंचूर व किसनवाडी परिसरात बिबट्यांचा वावर वाढला असून शेतकऱ्यांमध्ये सतत दहशतीचे वातावरण आहे. सध्या शेतात मशागतीची आणि काढणीची महत्त्वाची कामे सुरू असताना थेट शेतात बिबट्यांचे दर्शन होत असल्याने शेतकरी आणि शेतमजुरांना जीव मुठीत धरून काम करावे लागत आहे.

विहिरीत पिल्लू पडल्याने मोठी दुर्घटना टळली असली, तरी या भागातील बिबट्यांचा कायमस्वरूपी बंदोबस्त करण्यासाठी वनविभागाने तातडीने आणखी पिंजरे लावावेत, अशी जोरदार मागणी परिसरातील शेतकऱ्यांनी केली आहे.

# भिवापूर येथील विशाल महाशिवलिंग मंदिरात धनोजे कुणबी समाजाच्या वतीने भजन संध्या व अभिषेक

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.१५, चंद्रपूर :** आमदार किशोर जोरगेवार यांच्या पुढाकारातून लालपेठ कॉलरी परिसरातील महाराष्ट्रातील पुरातन व विशाल महाशिवलिंग मंदिरात दर सोमवारी विविध समाज, समाजसेवी संस्था आणि धार्मिक संस्थांच्या वतीने धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे. या उपक्रमांतर्गत यावेळी धनोजे




कुणबी समाज, चंद्रपूर यांच्या वतीने भजन संध्या, अभिषेक, आरती आणि प्रसाद वितरण कार्यक्रम भक्तिमय वातावरणात पार पडला. यावेळी सर्वांच्या सुख-समृद्धीसाठी, उत्तम आरोग्यासाठी तसेच चंद्रपूर शहराच्या सर्वांगीण प्रगतीसाठी भगवान महादेवाच्या चरणी प्रार्थना केली. भजन संध्या आणि आरतीमुळे मंदिर परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते. भाविकांनी मोठ्या श्रद्धेने या धार्मिक कार्यक्रमात सहभाग घेतला.

विशाल महाशिवलिंग मंदिर हे श्रद्धा, भक्ती आणि आध्यात्मिक ऊर्जेचे महत्त्वपूर्ण केंद्र असून, या ठिकाणी विविध समाज आणि संस्थांना धार्मिक कार्यक्रमांच्या माध्यमातून सहभागी होण्याची संधी मिळावी, या उद्देशाने आ. किशोर जोरगेवार यांच्या पुढाकारातून हा उपक्रम राबविण्यात येत आहे. दर सोमवारी आयोजित होणाऱ्या या कार्यक्रमांमुळे विविध समाजांना धार्मिक परंपरा जपण्यासोबतच सामूहिक भक्तीचा अनुभव घेण्याची संधी उपलब्ध होत आहे. या कार्यक्रमाचे यजमानपद धनोजे कुणबी समाज, चंद्रपूरचे अध्यक्ष श्रीधर मालेकर यांनी भूषविले. यावेळी विशाल महाशिवलिंग सेवा समिती, लालपेठ, चंद्रपूरचे पदाधिकारी, धनोजे कुणबी समाजाचे सदस्य, भाविक आणि आयोजक उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी आ. किशोर जोरगेवार यांनी आयोजकांचे अभिनंदन केले.

अक्षराज



# अडचणीच्या काळात पालकमंत्र्यांनी खऱ्या अर्थाने आधार दिला

## दुष्काळग्रस्त बळीराजाची दिवाळी गोड करण्यासाठी मंत्री प्रताप सरनाईकांचा २ लाख मोफत शिधा संचाचा ऐतिहासिक उपक्रम

**अक्षराज : घनश्याम आंबोकर**

**दि.१५, मिरा भाईंदर :** राजकारण हे केवळ सत्तेसाठी नसून, समाजातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचण्याचे ते एक प्रभावी माध्यम असले पाहिजे, या उच्च विचारांना प्रत्यक्ष कृतीतून सिद्ध करणारे महाराष्ट्र राज्य परिवहन मंत्री तथा धाराशिव जिल्हा पालकमंत्री प्रताप इंदिराबाई बाबुराव सरनाईक यांनी पुन्हा एकदा आपली सामाजिक बांधिलकी अत्यंत पोटतिडकीने दाखवून दिली आहे.

महाराष्ट्राच्या काही भागांमध्ये शेतकरी आणि त्यांचे कुटुंब निसर्गाच्या लहरीपणावर आणि भीषण पाणीटंचाईवर मात करत दिवसरात्र राबत आहेत. अशा कठीण प्रसंगी जगाचा पोशिंदा असलेल्या बळीराजाच्या घरी सणासुदीच्या आनंदात कुठलीही उणीव भासू नये, म्हणून मंत्री सरनाईक यांनी ऐतिहासिक आणि लक्षवेधी पाऊल उचलले आहे. धाराशिव जिल्ह्यातील तब्बल २ लाखांहून अधिक दुष्काळग्रस्त शेतकरी कुटुंबांची यंदाची दिवाळी गोड आणि आनंदाची होणार आहे.




**स्वतः मंत्र्यांकडून पाहणी; मी जे बोलतो, ते करून दाखवतो**

या विशेष उपक्रमाच्या तयारीचा आणि वितरणाचा आढावा घेण्यासाठी आज, १५ ऑक्टोबर २०२६ रोजी परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी प्रत्यक्ष उपक्रमाच्या तयारी स्थळाची पाहणी केली. प्रत्येक साहित्य व्यवस्थित पॅक होत आहे की नाही, गरजवंतांपर्यंत ती वेळेत पोहोचेल का, याची पाहणी करत त्यांनी संपूर्ण यंत्रणेला कडक निर्देश दिले.

**काय असणार आहे या विशेष 'दिवाळी भेटी'मध्ये?**

ठाणे-ओवळा माजिवडा विधानसभा मतदारसंघातील लोकमान्य नगर येथे महिला बचत गटांच्या हजारो महिलांनी एकत्र येऊन या उपक्रमासाठी अहोरात्र मेहनत घेतली आहे. महिला सक्षमीकरणाचा हा अनोखा संगम साधत तयार करण्यात आलेल्या या दिवाळी भेटीमध्ये एकूण दहा महत्त्वाच्या वस्तूंचा समावेश आहे:

* १ किलो रवा
* १ किलो साखर
* १ किलो वनस्पती घी
* १ किलो मैदा
* १ किलो बेसन
* सुगंधित उटणे
* लक्ष्मीची पावले
* नवीन वर्षाची दिनदर्शिका
* सणाची पणती
* आवश्यक शिधा व सणासुदीच्या इतर वस्तू.

दिवाळीच्या पूर्वसंध्येला ही भेट धाराशिव जिल्ह्यातील प्रत्येक दुष्काळग्रस्त शेतकऱ्याच्या घरात आदराने पोहोचवली जाईल. या कामात कोणतीही कसूर राहू नये, यासाठी सर्व शिवसैनिकांना युद्धपातळीवर कामाला लागण्याचे स्पष्ट निर्देश मंत्री सरनाईक यांनी दिले आहेत.

**लोककल्याणकारी राजकारणाचा नवा आदर्श**

मागील वर्षीही धाराशिवमधील नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना १०१ दुभत्या गाईंचे वाटप करून त्यांना आर्थिक स्थैर्याचा आधार देणारे मंत्री सरनाईक यंदा देखील दिवाळीची थेट प्रत्येकाच्या घरी पोहोचवणार आहेत. केवळ ओवळा-माजिवडा (मतदारसंघ क्र. १४६) आणि मिरा-भाईंदर (मतदारसंघ क्र. १४५) या मतदारसंघांतीलच नव्हे, तर धाराशिवच्या कानाकोपऱ्यातील वंचित घटकांपर्यंत पोहोचून हा आनंदोत्सव साजरा केला जात आहे.

संकटाच्या गर्तेत सापडलेल्या शेतकऱ्याला केवळ धीर देण्याचे काम न करता, त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहणाऱ्या मंत्री प्रताप सरनाईक यांच्या या स्तुत्य उपक्रमामुळे संपूर्ण महाराष्ट्रात त्यांचे कौतुक होत असून, एका संवेदनशील नेत्याचा परिपूर्ण चेहरा यानिमित्ताने पुन्हा एकदा जनतेसमोर आला आहे.

या प्रसंगी उपस्थित पत्रकारांशी संवाद साधताना मंत्री सरनाईक म्हणतात की, राजकारणात घोषणा अनेकजण करतात, पण संकटसमयी धावून जाणारा खरा नेता तोच असतो जो शब्दाला जागतो! मी जे बोलतो, ते करून दाखवतो. माझ्या धाराशिवमधील बळीराजाच्या चेहऱ्यावर आनंद फुलवणे हेच माझे आद्य कर्तव्य आहे.

विरोधक केवळ भाषणे करतात, आम्ही थेट कृतीतून शेतकऱ्यांच्या दारात दिवाळी पोहोचवतो! हा केवळ मदतीचा हात नाही, तर संकटकाळात संपूर्ण महाराष्ट्र आपल्या शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभा आहे, हा विश्वास देण्याचा प्रयत्न आहे.

# कोक ग्रामपंचायतीची इमारत पाडली; निर्लेखन प्रस्ताव, अंदाजपत्रक कुठे...?

**अक्षराज : रहीम कोक्कर**

**दि.१५, कोक (परभणी) :** जिंतूर तालुक्यातील कोक येथील ग्रामपंचायत कार्यालयाची जुनी इमारत पाडण्यात आल्याने या पाडकामाच्या प्रशासकीय प्रक्रियेबाबत प्रश्न उपस्थित होत आहेत. इमारत पाडण्यापूर्वी निर्लेखनाचा प्रस्ताव तयार करण्यात आला होता का? संबंधित सक्षम प्राधिकाऱ्याची मंजुरी घेण्यात आली होती का? पाडकामासाठी तांत्रिक अंदाजपत्रक तयार करून खर्चाला मान्यता देण्यात आली होती का? या प्रश्नांची उत्तरे मिळविण्यासाठी पत्रकाराने संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांकडे विचारणा केली असता, अद्याप या प्रकरणातील सर्व बाबी स्पष्ट झालेल्या नाहीत.

शासकीय मालमत्तेच्या पाडकामाची प्रक्रिया नियमानुसार पूर्ण झाली होती की नाही, हे तपासण्यासाठी आवश्यक कागदपत्रांची पडताळणी होणे गरजेचे आहे. मात्र, निर्लेखन प्रस्ताव आणि अंदाजपत्रकाबाबत स्पष्ट माहिती मिळत नसल्याने कोक ग्रामपंचायतीच्या कारभारावर प्रश्न उपस्थित होत आहेत.

**ग्रामसेवक प्रशांत खंदारे यांचे उत्तर काय?**

कोक ग्रामपंचायतीचे ग्रामसेवक प्रशांत खंदारे यांना पत्रकाराने निर्लेखनाचा प्रस्ताव आणि इमारत पाडकामाच्या अंदाजपत्रकाबाबत विचारणा केली. त्यावेळी संबंधित कागदपत्रे कुठे ठेवली आहेत, हे पाहावे लागेल, पाहू देऊ, अशा स्वरूपाचे उत्तर मिळत असल्याचे पत्रकाराने सांगितले. ग्रामपंचायतीच्या कार्यालयीन कामकाजाशी संबंधित महत्त्वपूर्ण कागदपत्रे उपलब्ध आहेत का, ती नेमकी कुठे आहेत आणि त्यांची पडताळणी कधी होणार, असे प्रश्न आता उपस्थित होत आहेत.निर्लेखनाचा प्रस्ताव तयार केला असेल, तर त्याची प्रत उपलब्ध करून देण्यात यावी. अंदाजपत्रक तयार केले असेल, तर त्यातील तरतुदी आणि खर्चाचा तपशील स्पष्ट करण्यात यावा. तसेच इमारत पाडण्यासंदर्भातील मंजुरी आदेशाची माहितीही सार्वजनिक करण्यात यावी, अशी मागणी होत आहे.

प्रशासक व्ही. एस. ढोणे यांची भूमिका काय?

या प्रकरणाबाबत पत्रकाराने ग्रामपंचायतीचे प्रशासक व्ही. एस. ढोणे यांच्याशी दूरध्वनीवरून संपर्क साधून इमारत पाडकामासंदर्भात माहिती विचारली होती. पत्रकाराच्या म्हणण्यानुसार, प्रशासक ढोणे यांनी निर्लेखनासंदर्भातील



माहिती मिळविण्यासाठी बांधकाम विभागातील देशमुख इंजिनिअर यांच्याकडे जाण्यास सांगितले. तसेच दोन तास थांबण्यास सांगितल्याचे पत्रकाराने नमूद केले आहे. मात्र, त्यानंतर मोबाईल बंद झाल्याने पुढील संपर्क साधण्यात अडचण आल्याचेही त्यांनी सांगितले. ग्रामपंचायतीच्या इमारतीच्या पाडकामासंदर्भात प्रशासक म्हणून ढोणे यांच्याकडे कोणती कागदपत्रे उपलब्ध आहेत? पाडकामापूर्वी आवश्यक प्रशासकीय प्रक्रिया पूर्ण झाली होती का? तसेच संबंधित कागदपत्रांची माहिती नागरिकांना किंवा पत्रकारांना कोणत्या विभागाकडून मिळणार, हे स्पष्ट होणे आवश्यक आहे. प्रशासकांची अधिकृत भूमिका आणि त्यांच्याकडील नोंदींची पडताळणी झाल्यानंतर या प्रकरणातील वस्तुस्थिती समोर येऊ शकेल.

**देशमुख इंजिनिअर यांच्याकडून कोणती माहिती मिळणार?**

प्रशासक व्ही. एस. ढोणे यांनी बांधकाम विभागातील देशमुख इंजिनिअर यांच्याकडे जाण्यास सांगितल्याने आता संबंधित अभियंत्याकडेही लक्ष लागले आहे.इमारत पाडण्यापूर्वी तिच्या बांधकामाची स्थिती तपासण्यात आली होती का? इमारत जीर्ण किंवा वापरण्यास अयोग्य असल्याचा तांत्रिक अहवाल तयार करण्यात आला होता का? निर्लेखनासाठी आवश्यक प्रस्ताव आणि पाडकामाचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले होते का? पाडकामाच्या कामाला तांत्रिक मान्यता देण्यात आली होती का? या प्रश्नांची उत्तरे संबंधित विभागाकडून मिळणे आवश्यक आहे.देशमुख इंजिनिअर यांच्याकडून या प्रकरणासंदर्भात अधिकृत प्रतिक्रिया आणि कागदपत्रांची माहिती अद्याप स्पष्ट झालेली नसल्याने त्यांची बाजू समोर येणेही महत्त्वाचे आहे.

**नेमकी कोणती कागदपत्रे तपासण्याची गरज?**

कोक ग्रामपंचायतीच्या इमारतीच्या पाडकामासंदर्भात पुढील बाबींची चौकशी होणे आवश्यक आहे.

१. निर्लेखन प्रस्ताव : इमारत पाडण्यासाठी अधिकृत प्रस्ताव तयार करण्यात आला होता का?

२. मंजुरी आदेश : सक्षम प्राधिकाऱ्याची लेखी मंजुरी घेण्यात आली होती का?

३. तांत्रिक अहवाल : इमारतीची स्थिती तपासून ती पाडण्याची शिफारस करण्यात आली होती का?

४. अंदाजपत्रक : पाडकामासाठी किती खर्च अपेक्षित होता आणि त्याला मंजुरी देण्यात आली होती का?

५. कार्यादेश : पाडकामाचे काम कोणाला आणि कोणत्या आदेशानुसार देण्यात आले?

६. खर्चाची नोंद : पाडकामासाठी प्रत्यक्ष किती खर्च झाला, याची नोंद उपलब्ध आहे का?

७. बांधकाम साहित्य : पाडकामानंतर मिळालेल्या साहित्याची विल्हेवाट कशी लावण्यात आली आणि त्याची नोंद ठेवण्यात आली का?या सर्व बाबींची कागदपत्रांवर आधारित पडताळणी झाल्यानंतरच पाडकामाची प्रक्रिया नियमानुसार झाली होती की नाही, याबाबत निष्कर्ष काढता येईल.

**चौकशी करून वस्तुस्थिती जनतेसमोर आणावी!**

कोक ग्रामपंचायतीची जुनी इमारत पाडण्यात आली आहे. मात्र, या पाडकामासंदर्भातील निर्लेखन प्रस्ताव, मंजुरी आदेश आणि अंदाजपत्रकाबाबत स्पष्ट माहिती मिळणे आवश्यक आहे. संबंधित कागदपत्रे उपलब्ध असतील, तर ती तपासणीसाठी सादर करून नागरिकांच्या मनातील शंका दूर कराव्यात. गटविकास अधिकारी, पंचायत समिती जिंतूर यांनी या प्रकरणातील कार्यालयीन नोंदींची तपासणी करून आवश्यक ती चौकशी करावी. तसेच निर्लेखनाची प्रक्रिया, तांत्रिक मान्यता आणि आर्थिक व्यवहार याबाबत वस्तुस्थिती स्पष्ट करावी, अशी मागणी करण्यात येत आहे. शासकीय इमारत पाडकामासारख्या विषयात पारदर्शकता असणे आवश्यक आहे. त्यामुळे कागदपत्रे उपलब्ध करून देणे, संबंधित अधिकाऱ्यांची भूमिका स्पष्ट करणे आणि नियमांनुसार प्रक्रिया पूर्ण झाली होती की नाही, याची पडताळणी करणे महत्त्वाचे ठरणार आहे.

# कुंडलवाडी ग्रामीण रुग्णालयाच्या कामांना गती; काही दिवसांत उद्घाटनाची शक्यता

**अक्षराज : दत्ता हमंद**

**दि.१५, कुंडलवाडी (नांदेड) :** शहरासह परिसरातील नागरिकांना दर्जेदार आरोग्यसेवा उपलब्ध करून देण्यासाठी कुंडलवाडी येथील ग्रामीण रुग्णालय लवकरात लवकर सुरू करण्याच्या दृष्टीने प्रशासकीय हालचालींना वेग आला आहे. आज जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.संजय पेरके यांनी वैद्यकीय पथकासह ग्रामीण रुग्णालयाची पाहणी करून सुरू असलेल्या कामांचा आढावा घेतला.

यावेळी रुग्णालयातील उर्वरित कामे आणि आवश्यक पूर्वतयारी लवकरात लवकर पूर्ण करण्याच्या सूचना संबंधितांना देण्यात आल्या. अवघ्या काही दिवसांत आदरणीय मंत्री महोदयांच्या हस्ते ग्रामीण



रुग्णालयाचे उद्घाटन करण्याच्या दृष्टीने तयारी सुरू असून, त्यापूर्वी सर्व आवश्यक कामे पूर्ण करण्यावर भर देण्यात येत आहे. दरम्यान, ग्रामीण रुग्णालय लवकर सुरू व्हावे, यासाठी जिल्हा शल्य चिकित्सक डॉ.संजय पेरके, उपजिल्हा रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. योगेश राजपूत ग्रामीण रुग्णालय कुंडलवाडीचे वैद्यकीय अधिकारी डॉ.शिवकुमार सावरगावे, बालरोगतज्ञ डॉ.कदम व वैद्यकीय टीम पथकाने नगराध्यक्षांच्या निवासस्थानी सदिच्छा भेट दिली होती. या भेटीदरम्यान रुग्णालय सुरू करण्यासंदर्भातील प्रशासकीय प्रक्रिया आणि पुढील कार्यवाहीबाबत चर्चा करण्यात आली.

यावेळी नगराध्यक्ष प्रतिनिधी गजानन रमेशराव कोटलावार उपस्थित होते. त्यांनी सर्वांचा यथोचित सन्मान व सत्कार केला. कुंडलवाडी ग्रामीण रुग्णालय सुरू झाल्यानंतर शहरासह परिसरातील नागरिकांना स्थानिक स्तरावर आरोग्य सुविधा उपलब्ध होण्यास मदत होणार आहे. त्यामुळे रुग्णालय लवकर सुरू होण्याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

## थोडक्यात बातम्या

### जेसीबीने पाडले देशी दारूचे दुकान, ३१ जणांविरुद्ध गुन्हा

**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.१५, नागपूर :** देशी दारूच्या दुकानाला विरोध करून दोन जेसीबीच्या साह्याने दुकान जमिनदोस्त करणाऱ्या ३१ आरोपींविरुद्ध खापरखेडा पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. ही घटना खापरखेडा पोलिस ठाण्याच्या हद्दीत, चणकापूरच्या अण्णामोड चौकात घडली असून यात १२ लाखांचे नुकसान झाल्याचा दावा दुकानमालकाने केला आहे.



आरोपींचा या दारू दुकानाला विरोध असल्याने ते दुकान हटविण्याची मागणी करीत होते. यासंदर्भात दुकानमालकाने ८ ऑक्टोबर २०२६ रोजी मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात धाव घेतली होती. हे प्रकरण न्यायप्रविष्ट असतानाच आरोपींनी पुरुष आणि महिलांचा जमाव गोळा केला. त्यानंतर दोन जेसीबी घटनास्थळी आणून दुकान पाडल्याचे तक्रारीत म्हटले आहे.

राहुल तिवारी, प्रकाश खापरे, रिंकू ऊर्फ विश्वजित सिंग, हंसराज सुखदेवे, राजेंद्र इंगोले, अमित भगत, पवन धुर्वे, मोहन थापा, रूपेश सावरकर, सोनल श्रीवास्तव, राजेंद्र गुप्ता, विनोद बालकेश्वर प्रसाद, प्रफुल्ल कर्णाळे, अनिल तांभळे, मंगेश चोरपगार, शुभम रंगारी, संकेत पाटील, बादल पाटील, राजभाऊ भड, सिद्धार्थ माने आणि अनिल ठाकरे व १० अज्ञात आरोपी अशी आरोपींची नावे आहेत. खापरखेडा पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ६३ वर्षीय तक्रारदार १९८७पासून 'एम.बी.कुहारे' नावाने देशी दारू दुकान चालवितात. या दुकानाच्या परवान्याचे १ एप्रिल २०२६ रोजी २०२६-२७ या आर्थिक वर्षासाठी त्यांनी नूतनीकरण केले होते.

### लोणीकंद येथे कर्तृत्ववान व्यक्ती व गुणवंत विद्यार्थ्यांचा दिमाखदार सन्मान सोहळा संपन्न

**अक्षराज : प्रमोद दिवेकर**

**दि.१५, लोणीकंद (पुणे) :** पीएमश्री जिल्हा परिषद प्राथमिक केंद्रशाळा, लोणीकंद येथे समाजासाठी उल्लेखनीय योगदान देणाऱ्या कर्तृत्ववान व्यक्ती आणि शैक्षणिक क्षेत्रात दैदिप्यमान यश संपादन करणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांचा भव्य सन्मान सोहळा नुकताच उत्साहात पार पडला. GIRIKUNJA AGRO REALTORS LLP यांच्या वतीने या विशेष कौतुक सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते.



या सोहळ्यास मुख्य अतिथींसह अनेक सामाजिक, राजकीय आणि क्रीडा क्षेत्रातील दिग्गज मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती. यामध्ये प्रामुख्याने भाजपा पुणे जिल्हा (उत्तर) अध्यक्ष व मार्गदर्शक प्रदीप कंद, भाजपा महाराष्ट्र प्रदेश क्रीडाध्यक्ष संदीप आप्पा भोंडवे, जि.प. सदस्य किरण सकरे,पंचायत समिती सदस्या मोनिका कंद, राणीताई वाळके आदी मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमादरम्यान समाजात वेगवेगळ्या स्तरावर उल्लेखनीय कार्य करणाऱ्या कर्तृत्ववान व्यक्तींना सन्मानित करण्यात आले. तसेच, शालेय स्तरावर उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव करून त्यांना पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी प्रोत्साहित करण्यात आले. याप्रसंगी आयोजकांच्या वतीने उपस्थित प्रमुख पाहुण्यांचाही विशेष सत्कार करण्यात आला. सत्काराला उत्तर देताना मान्यवरांनी सर्व आयोजकांचे मनःपूर्वक आभार व्यक्त केले.

**असे उपक्रम समाजासाठी प्रेरणादायी :** उपस्थितांना मार्गदर्शन करताना मान्यवर म्हणाले की, समाजासाठी अविरत कार्य करणाऱ्या कर्तृत्ववान व्यक्तींचा सन्मान करणे आणि गुणवंत विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देणे हे अत्यंत कौतुकास्पद आहे. असे उपक्रम निश्चितच समाजाला एक नवी दिशा देणारे आणि प्रेरणादायी ठरणारे आहेत. यातूनच समाजाच्या उज्ज्वल भविष्याची निर्मिती होईल.

या दिमाखदार सोहळ्यासाठी लोणीकंद व परिसरातील नागरिक, विविध क्षेत्रातील मान्यवर, शिक्षक, पालक आणि विद्यार्थी अतिशय मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे नियोजन आणि संयोजन GIRIKUNJA AGRO REALTORS LLP च्या वतीने अत्यंत उत्कृष्टरित्या करण्यात आले होते.

### शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कारासाठी अर्ज प्रक्रिया सुरू

**अक्षराज : संदिप येवले**

**दि.१५, घाटकोपर (मुं.उपनगर) :** महाराष्ट्र शासनाच्या क्रीडा विभागामार्फत सन २०२४-२५ व सन २०२५-२६ या वर्षांसाठी शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहेत. राज्यातील क्रीडा क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या खेळाडू,क्रीडा मार्गदर्शक आणि अन्य पात्र व्यक्तींना या पुरस्कारांनी सन्मानित करण्यात येणार आहे.

क्रीडा क्षेत्रातील ज्येष्ठ क्रीडा महर्षींसाठी जीवन गौरव पुरस्कार, उत्कृष्ट क्रीडा मार्गदर्शकांसाठी जिजामाता राज्य क्रीडा पुरस्कार, खेळाडूंसाठी शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार,तसेच साहसी उपक्रम आणि दिव्यांग खेळाडूंसाठी स्वतंत्र पुरस्कार देण्यात येतात.

शासन निर्णयानुसार, शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार सुधारित नियमावली २०२३ अंतर्गत सन २०२४-२५ व सन २०२५-२६ या वर्षांच्या पुरस्कारांसाठी राज्यातील पात्र खेळाडू व व्यक्तींना ऑनलाइन पद्धतीने अर्ज करता येणार आहे.अर्ज करण्याची मुदत १२ ऑक्टोबर २०२६ ते १५ नोव्हेंबर २०२६ अशी आहे.

इच्छुक क्रीडा मार्गदर्शक,खेळाडू,साहसी उपक्रमांमध्ये सहभागी व्यक्ती आणि दिव्यांग खेळाडूंनी क्रीडा विभागाच्या अधिकृत संकेतस्थळावर https://sports.maharashtra.gov.in येथे जाऊन ऑनलाइन अर्ज सादर करावेत,असे आवाहन करण्यात आले आहे.

अर्ज सादर करण्याची अंतिम मुदत १५ नोव्हेंबर २०२६ असून,त्या दिवशी रात्री ११.५९ वाजेपर्यंत ऑनलाइन अर्ज स्वीकारले जाणार आहेत. ही माहिती मुंबई उपनगर जिल्ह्याच्या जिल्हा क्रीडा अधिकारी सायली जाधव यांनी प्रसिद्ध केलेल्या वृत्तपत्रीय टिपणीत देण्यात आली आहे.